कुष्ठ (Skin diseases) पथ्य

चिकित्सा सूत्र : "पक्षात्पक्षात् छर्दनानि मासान्माद्विरेच नम् ।
नस्यंत्र्यहा त्यहांन्मासी षष्ठेषष्ठेख ऽ भोक्षणम् ||"

नाष्टा : (खालीलपैकी नाश्त्याला एक पदार्थ खावा.)

- दुग्धाहार - गाईचे दूध सुंठ/ वेलची सिध्द, आल्याचा चहा अर्धा अर्धा कप चालेल.
- फलाहार - डाळिंब , द्राक्षे , लिंबू , काळ्या मनुका, टरबुज,
- यूष/सूप - मूग/ तूर/मसूर मटकी यांचे सुंठ, धणे, जीरे फोडणी दिलेले सूप किंवा खालील वर्णित फळभाज्या, पालेभाज्यांचे सूप.
- लघ्वाहार - रव्याचा उपमा शिरा/भाजलेले पोहे.

जेवण : दुपारी 12 वाजता व संध्याकाळी 7 वाजता जेवण करावे.

- फळभाज्या - सर्व चालतील (बटाटा, टोमॅटो, भारताचे वांगे, रताळे सोडून)
- पालेभाज्या - शेवगा, चवळाई (तांदुळजा),कोथींबीर.
- धान्य - गव्हाचे फुलके/ ज्वारी/ नाचणी/सातू बाजरी / तांदूळ यांची भाकरी.
- भात - जुन्या तांदळाचा भाजून केलेला भात/ मुगाची खिचडी.
- कढण सूप - वर वर्णन केलेले घ्यावे.
- मांसाहार - कोंबडी, बोकड (बोकडाच्या पायांचे सूप).
- संस्कारीत जल - उष्णोदक (सकाळी गरम केलेले पाणी)/ बावची/ लाह्यांचे पाणी.
- इतर - आले, ओली हळद ,कांदा

विहार :

- ब्रम्हचर्य पाळावे (शारिरिक संबंध ठेवू नये).
- स्नान कडूनिंबाच्या पानानी करावे ,सुगंधी अत्तर लावणे, औषधी लेप
- दिवसा झोपणे व रात्री जागरण टाळावे.

विशिष्ट पथ्य :

- दुधासोबत इतर काही खाऊ नये. चमचमीत पदार्थ टाळावे.
- शिळे अन्न खावू नये. तेलकट पदार्थ टाळावेत.
- मिल्कशेक, कोणतेही फळ व दुध एकत्र करून खाणे टाळावे.
- इडली, डोसा, पिझ्झा, चायनीज, बर्गर असे आंबवलेले व मसालेदार पदार्थ टाळावे.
- सॉस, जॅम चा वापर करु नये.
- दह्या सारखे आंबट पदार्थ खाऊ नये. ताज गोड ताक चालेल.
- चॉकलेट, बिस्किट , खारी , टोस्ट असे बेकरीचे पदार्थ टाळावे.
- चहाच्या आधी व नंतर पाणी पिऊ नये.

अधिक माहिती करीता खाली दिलेल्या चिन्हांवर क्लिक करा

सर्व आजारांच्या पथ्य-अपथ्यांची अनुक्रमणिका → index

क्र.	माधवप्रिया शाखा	संपर्क	पत्ता
१	घाटकोपर - प्रमुख शाखा	7045607187	
२	कांदिवली	7304751357	
३	गिरगाव	022-22081081	
४	पुणे - तिसरा रविवार	8169507436	
५	कोल्हापूर - पहिला रविवार	7045607187	